कर्जतमध्ये मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्यांवर पोलिस कारवाई

वार्ताहर

कर्जत, दि. २२ - कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी जारी करण्यात लॉकडाऊनमध्येही काही नागरिक प्रशासनाच्या सूचनांना केराची टोपली दाखवत आहेत. तथापि, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलिस कारवाईला तोंड द्यावे लागत आहे. याचाच प्रत्यय आज कर्जतकरांना आला. संचारबंदी असूनही कर्जतमध्ये मॉर्निंग वॉकसाठी बाहेर गेलेल्या ४५ नागरिकांवर पोलिसांनी कारवाई केली आहे.

कोरोनाची साखळी तुटावी यासाठी संचारबंदी, लॉकडाऊन, स्वेच्छा बंद असे अनेक उपाय सुरू असताना पहाटे मॉर्निंग वॉक साठी जाणाऱ्यांची संख्या मात्र वाढू लागली. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी कर्जत पोलिसांनी आज सकाळी ४५ मॉर्निंग वॉक करणाऱ्यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले आणि शिक्षा म्हणून त्यांच्याकडून दोन तास सूर्यनमस्कार, योगा करून घेऊन समज देऊन सोडण्यात आले. कर्जत तालुक्यात मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्या खूप आहे. पहाटे ५ वाजल्यापासूनच नागरिक मॉर्निंग वॉकला निघतात. कर्जत-मुरबाड हायवे, तहसील टेकडी, मालवाडी रस्ता, गार्डनमध्ये असलेल्या जॉगिंग ट्रॅक, इंजिनिअरिंग कॉलेज रोड, अकुरले रस्ता, चारफटा ते कल्याण रस्ता, पळसदरी रस्ता आदी ठिकाणी मॉर्निंग वॉकसाठी नागरिक बाहेर पडतात. कोरोनाचे भयानक संकटाशी सामना करताना अनेक उपाय सुरू आहेत. संचारबंदी, लॉक डाऊन यांची अंमलबजावणी सुरू असताना मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्या कमी होत नव्हती उलट दिवसभर घरात रहावे लागत असल्याने मॉर्निंग वॉकचे कारण सांगून बाहेर पडणारांची संख्या वाढू लागली.

याबाबत दोन-तीन दिवस लक्ष ठेवल्याने पोलिसांनी आज सकाळी सातच्या सुमारास पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण भोर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन गावडे, पोलीस नाईक सचिन नरुटे, भूषण चौधरी, आशरूबा बेंद्रे, महिला पोलीस नाईक दिव्या देशमुख, पूनम डोमे, संजना सांगळे, बाबासाहेब जाधव, मेहबूब तांडेल, वाघोजी कोलमकर यांनी विविध ठिकाणी जाऊन मॉर्निंग वॉक करणाऱ्यांना ताब्यात घेतले. यामध्ये ३८ पुरुष आणि ७ महिला अशा ४५ जणांचा समावेश आहे. या सर्वांना पोलीस ठाण्यात आणले गेले आणि तब्बल दोन तास त्यांच्याकडून भूषण चौधरी आणि आशरुबा बेंद्रे यांनी त्यांना शिक्षा म्हणून सूर्यनमस्कार आणि योगाचे काही प्रकार करून घेतले आणि नंतर समज देऊन त्यांना सोडून देण्यात आले. यामध्ये जेष्ठ नागरिक, व्यापारी, नोकरदार, प्रतिष्ठित नागरिकांचाही सहभाग होता. यावेळी उपस्थित पोलीस उपनिरीक्षक सचिन गावडे यांनी तुम्ही शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडत आहात, शासनाने घरी राहण्याचा सल्ला दिला आहे, कोरोना तालुक्यातील नेरळ पर्यंत आला आहे, काळजी घ्या आणि घरीच रहा असा सल्ला यावेळी दिला.

आजारी पोलीस हवालदारासाठी रुग्णालयात जागा न मिळाल्याने पोलिसांमध्ये संताप

प्रतिनिधी

मुंबई, बुधवार - तापामुळे रुग्णालयात दाखल होण्यासाठी गेलेल्या एका पोलीस हवालदाराला जागा नाही असे सांगून घरी पाठवण्याचा प्रताप तीन सरकारी रुग्णालयांनी केल्याचे उघडकीस आले आहे. अखेर वरिष्ठांनी दम देताच सदर हवालदाराला केईएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करून घेण्यात आले. दरम्यान, आजारी पोलिसाला जागा नाही म्हणून तीन रुग्णालयांत प्रवेश देण्यात न आल्याने पोलीस दलात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे.

कुर्ला वाहतूक पोलीस विभागात शिवाजी सोनावणे हे सध्या पोलीस हवालदार म्हणून नेमणूकीस आहे. सोमवारी घरी असताना त्यांना अचानक ताप आल्याने ते खासगी दवाखान्यात गेले होते. तिथे औषधोपचार केल्यानंतर त्यांना कस्तुरबा रुग्णालयात पाठवण्यात आले, मात्र तिथे जागा नसल्याने त्यांना नायर आणि केईएम रुग्णालयात पाठवण्यात आले. मात्र या दोन्ही रुग्णालयांत गेल्यानंतर त्यांना जागा नसल्याने प्रवेश देण्यात आला नाही. तोपर्यंत त्यांची प्रकृती प्रचंड ढासळली होती. हा प्रकार वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणदिवे यांच्या लक्षात येताच त्यांनी कंट्रोल रुमसह भोईवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांबळे यांना सदर माहिती दिली. या घटनेनंतर मंगळवारी रात्री १० वाजता त्यांना केईएम रुग्णालयात दाखल करून घेण्यात आले. केईम रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक २० मध्ये त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याचे समजते. दरम्यान, पोलीस हवालदार शिवाजी सोनावणे यांच्याबाबत आरोग्य यंत्रणेकडून झालेल्या या हलगर्जी तसेच निष्काळजीपणाच्या वृत्तीने पोलीस दलात प्रचंड संतापाची लाट आहे.

टिकटॉकवर पोलिसांची बदनामी केल्याप्रकरणी तिघांना अटक

प्रतिनिधी

मुंबई, बुधवार - टिकटॉकवर पोलिसांची बदनामी केल्याप्रकरणी तिघांना ॲण्टॉप हिल पोलिसांनी अटक केली आहे. त्यात एका सतरा वर्षांच्या अल्पवयीन मुलाचा समावेश असून त्याच्या पालकांना याबाबत योग्य समज देऊन त्याचा ताबा देण्यात आला आहे. इतर दोघांनाही नंतर जामिनावर सोडून देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र लॉकडाऊन सुरू असले तरीही २१ एप्रिलला ॲण्टॉप हिल येथे एका पोलिसांच्या व्हॅनजवळ एका तरुणाने पोलिसांची प्रतिमा मलिन होईल असे संभाषण करून टिकटॉक व्हीडिओ बनवला व तो समाजमाध्यमांवर व्हायरल केला. हा व्हीडिओ नंतर पोलिसांच्या निदर्शनास येताच त्याची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत या तरुणांविरुद्ध गुन्हा नोंदवला. या आरोपीचा शोध सुरू असताना काही तासांत पोलिसांनी व्हीडिओ बनवणाऱ्या तरुणासह त्याच्या दोन मित्रांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनीच हा व्हीडिओ बनवून पोलिसांनी बदनामी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली. अटकेनंतर त्यांना जामिनासह नोटीस देऊन सोडून देण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून शहरात लॉकडाऊन असतानाही काहीजण सोशल मिडीयावर आक्षेपार्ह व्हीडिओ अपलोड करुन पोलिसांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा व्हीडिओ बनविणाऱ्या तरुणांविरुद्ध आता पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

कर्जत, मुरबाडकरांना दिलासा

संशयित वैद्यकीय अधिकाऱ्यांचा कोरोनाचा अहवाल नकारात्मक

वार्ताहर

कर्जत, दि. २२ - अंबरनाथ येथील कोरोनाचा अहवाल सकारात्मक असलेल्या भावाला भेटायला गेलेले नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या पत्नीची कोरोना चाचणी नकारात्मक आली आहे. काल २१ एप्रिल रोजी मुंबई येथून कस्तुरबा रुग्णालय येथून आलेल्या आरोग्य पथकाने त्यांचे स्वॅबचे नमुने घेतले होते. काल रात्रीच त्यांच्या कोरोना चाचणीचे अहवाल आले असून ते नकारात्मक असल्याने कर्जत आणि मुरबाडकरांना कोरोनाबाबत काहीसा दिलासा मिळाला आहे.

सदर डॉक्टर हे अंबरनाथ येथे राहणाऱ्या आपल्या भावाला भेटायला १४ एप्रिल रोजी गेले होते आणि तेथून येऊन त्यांनी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात १५ एप्रिलपासून १७ एप्रिलपर्यंत आपली सेवा बजावली. दरम्यान, त्यांच्या भावाची कोरोना चाचणी सकारात्मक आल्यानंतर सदर डॉक्टरांना क्वारंटाईन व्हावे लागले. तथापि, कोरोनाची चाचणी तत्काळ करण्याचे आदेश असूनही त्यांची २० एप्रिलपर्यंत चाचणी केली नव्हती. त्याबाबत सर्वत्र गोंगाट सुरू झाल्याने काल २१ एप्रिल रोजी मुरबाड तहसीलदार यांच्या आदेशाने तेथील पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक बोऱ्हाटे यांनी सदर डॉक्टरांची त्यांच्या राहत्या घरी जाऊन त्यांना कोरोना चाचणी करायला लावली. त्यांचे स्वॅबचे नमुने मुंबईहून आलेल्या आरोग्य यंत्रणेने नेले होते आणि त्यांचा अहवाल रात्री आला असून सदर डॉक्टर व त्यांच्या पत्नीला कोरोनाची लागण झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

श्रीवर्धनमध्ये ग्राहकांना सामान मिळणार घरपोच

प्रतिनिधी

श्रीवर्धन, दि. २२ - कोरोनाच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धनमधील सर्व बाजारपेठा २४ एप्रिलपासून बंद ठेवण्याचा निर्णय व्यापारी संघटनेने घेतला आहे. तथापि, यामुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी आपल्याला हव्या असलेल्या गोष्टींची यादी व्हॉट्सॲपवरून संबंधित दुकानदारांना दिल्यास ग्राहकांना सामान घरपोच मिळणार आहे.

कोरोनाचे गांभीर्य पुरेसे लक्षात न घेतल्याने काही नागरिक प्रशासनाचे लक्ष चुकवून लॅकडाऊन व संचारबंदीच्या काळात बाहेर फिरताना दिसतात. प्रशासनसुद्धा अशा लोकांपुढे हतबल झालेले दिसत आहे. त्यामुळे श्रीवर्धन शहरातील कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीकोनातून व्यापारी संघटना श्रीवर्धन यांच्या वतीने अतिशय महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. २४ एप्रिलपासून ३ मेपर्यंत लॉगडाऊन असेपर्यंत श्रीवर्धन शहरातील मेडिकलची दुकाने सोडून इतर सर्व किराणा मालाची दुकाने पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत, असे ठरविण्यात आले आहे. परंतु या कालावधीत ग्राहकांना लागणारे अत्यावश्यक साहित्य, सामुग्रीची यादी बनवून श्रीवर्धन शहरातील व्यापारी बांधवांना व्हॉटसअपद्वारे पाठवून द्यावे. त्यांना घरपोच साहित्य सामुग्री देण्यात येईल. ग्राहकांना दुकानापर्यंत येण्याची आता गरज लागणार नाही, असे व्यापारी संघटना श्रीवर्धन यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

Reliance
Industrial Infrastructure Limited

नोंदणीकृत कार्यालय: एनकेएम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, ११८ बॅकबे रिक्लेमेशन, एलआयसी योगक्षेमा बिल्डिंगच्या पाठीमागे, बाबुभाई चिनाय रोड, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी: ०२२-४४७७ ९०१३ • फॅक्स नं. ०२२-४४७७ ९०५२
ई-मेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019

३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय परिणामांचा गोषवारा

(रु.लाखात, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

तपशील	३१ मार्च २०२० रोजी संपलेले वर्ष	३१ मार्च २०१९ रोजी संपलेले वर्ष
प्रचलनाद्वारे एकुण मिळकत (निव्वळ)	७,९७९.६४	८,४५८.५८
करपूर्व सामान्य कामकाजाद्वारे निव्वळ नफा	१,१०४.१५	१३५२.९९
करपश्चात सामान्य कामकाजाद्वारे निव्वळ नफा	९७०.८४	९३१.६५
करपश्चात एकुण सर्वसमावेशक मिळकत	५०५.७१	२,३०१.७१
इक्विटी समभाग भांडवल	१,५१०.००	१,५१०.००
पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी (राखीव)	३५,५१८.१५	३५,५५८.५४
प्रति समभाग मिळकत (दर्शनी मूल्य प्रत्येकी रू.१०/-) (निरंतर प्रचलनासाठी)(वार्षिकीकृत न केलेले)		
मूळ	६.४३	६.१७
सौम्य	६.४३	६.१७

टिपा:

१. २२ एप्रिल २०२० रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे.

वित्तीय परिणामांच्या स्वतंत्र वित्तीय पद्धतीविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(रु.लाखात)

तपशील	३१ मार्च २०२० रोजी संपलेले वर्ष	३१ मार्च २०१९ रोजी संपलेले वर्ष
प्रचलनाद्वारे एकुण मिळकत (निव्वळ)	७,९७९.६४	८,४५८.५८
करपूर्व सामान्य कामकाजाद्वारे निव्वळ नफा	९२६.०१	१,१९९.५७
करपश्चात सामान्य कामकाजाद्वारे निव्वळ नफा	७९२.७०	७७९.०३
करपश्चात एकुण सर्वसमावेशक मिळकत	३२७.५७	२,१४९.०९

२. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या तपशिलवार स्वतंत्र/एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणामांचा वरील संक्षिप्त गोषवारा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) नियम, २०१५ मधील नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर करण्यात आला आहे. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या वर्षाच्या तपशिलवार स्वतंत्र/एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटसवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **(www.riil.in)** येथे उपलब्ध आहे.

रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
दिलिप व्ही. घेराय
एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर

स्थळ : मुंबई
दिनांक : २२ एप्रिल, २०२०

www.riil.in

इंडोस्टार कॅपिटल फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : वन इंडियाबुल्स सेंटर, २०वा मजला, टॉवर २ए, ज्युपिटर मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, मुंबई-४०० ०१३, इंडिया। **दूरध्वनी :** +९१ २२ ४३१५५०००, **फॅक्स :** +९१ २२ ४३१५५०१०, **सीआयएन :** L65100MH2009PLC268160
संकेतस्थळ : www.indostarcapital.com, **ई-मेल :** contact@indostarcapital.com

संयुक्त जाहीर सूचना

ही सूचना, इंडोस्टार कॅपिटल फायनान्स लिमिटेड (दि **"कंपनी"**), बीसीपी V मल्टिपल होल्डिंग्ज पीटीई लिमिटेड (दि **"अॅक्वायरर"** [or **"संपादनकर्ते"**]) आणि इंडोस्टार कॅपिटल (दि **"सेलर"** [**"विक्री करणारे"**] /**"ICM"**) ह्यांच्या द्वारे रिझर्व बँक ऑफ इंडिया (**"आरबीआय"**) द्वारा जारी केलेल्या आणि १७ फेब्रुवारी, २०२० (**"आरबीआय डायरेक्शन्स"**) रोजी सुधारणा आणि अपडेट केलेला संदर्भ क्रमांक मास्टर डायरेक्शन DNBR.PD.००८/०३.१०.१९९/२०१६-१७ धारित मास्टर डायरेक्शन - नॉन बँकिंग फायनान्शियल कंपनी - सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट नॉन-डिपॉजिट टेकिंग कंपनी अँड (or आणि) डिपॉजिट टेकिंग कंपनी (**रिझर्व बँक**) डायरेक्शन्स, २०१६ च्या परिच्छेद ६९ च्या अनुसार जारी करण्यात आली आहे.

पार्श्वभूमी

ही कंपनी एक नॉन-डिपॉजिट टेकिंग सिस्टिमॅटिकली इंपॉर्टंट नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी (**"NBFC-ND-SI"**) आहे, जी २० जानेवारी २०१६ तारखेच्या संदर्भ क्रमांक N-१३.०२१०९ धारित सर्टिफिकेट ऑफ रजिस्ट्रेशनच्या अटींमध्ये आरबीआयकडे नोंदवलेली आहे, आणि तिचे नोंदणीकृत कार्यालय वन इंडियाबुल्स सेंटर, २० वा मजला, टॉवर २ए, ज्युपिटर मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, मुंबई ४०० ०१३ येथे आहे.

दि अॅक्वायरर [or संपादनकर्ते] ही सिंगापूरच्या कायद्यांच्या अंतर्गत २७, नोव्हेंबर २०१८ रोजी नोंदणी क्रमांक २०१८४००८०G सह स्थापन झालेली आणि इन्कम अॅट रिफ्लस १६ कॉलिवर, क्वे १९-००, सिंगापूर, ०४९३१८ येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली एक कंपनी आहे. दि अॅक्वायरर ही ब्रूकफील्ड ॲसेट मॅनेजमेंट, इंक. द्वारा व्यवस्थापन करण्यात येणाऱ्या विशिष्ट खाजगी इक्विटी फंड्सची संलग्न कंपनी आहे.

दि सेलर ही कंपनीची प्रवर्तक भागधारक आहे आणि ह्या तारखेला तिच्याकडे कंपनीचे प्रत्येकी ₹ १० (**"इक्विटी शेअर्स"**) दर्शनी किमतीचे ५,२५,९४,२२८ इक्विटी शेअर्स आहेत, जे कंपनीच्या भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या ५६.८९% एवढे भरतात.

प्रस्तावित व्यवहार (or ट्रॅंजॅक्शन) आणि प्रस्तावित व्यवहाराचे (or ट्रॅंजॅक्शनचे) कारण

दि अॅक्वायरर [or संपादनकर्ते] कंपनीच्या भरणा-केलेल्या भाग भांडवलाच्या ४०% (चाळिस टक्के) हिश्शाचे (or स्टेकचे) पूर्णपणे सौम्यीकृत धर्तीवर संपादन करू इच्छितात, जे सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सबस्टेन्शियल अॅक्विजिशन ऑफ शेअर्स अँड टेकओवर्स) निबम, २०११ च्या अनुसार ३१ जानेवारी २०२० (**"टेंडर ऑफर"**) तारखेच्या जाहीर घोषणेच्या अनुसार अॅक्वायरर द्वारा केलेल्या सक्तीच्या खुल्या ऑफर मधील कंपनीच्या सार्वजनिक भागधारणेद्वारा इक्विटी शेअर्सच्या प्रत्यक्ष टेंडरिंगच्या सापेक्ष, ह्या मेळांद्वारे राहील:

(क) अॅक्वायररच्या पुढील सिक्युरिटीजचा कंपनीद्वारा प्रेफरेन्शियल इश्यू, एकुणात सुमारे ₹ १,२२५,००,००,००० आहे : (१) प्रति इक्विटी शेअर ₹ २९० किंमतीने ३,०१,७२,४१४ इक्विटी शेअर्स; आणि (२) प्रति प्रेफरन्स शेअर ₹२९० किंमतीने, प्रत्येकी ₹१० दर्शनी किंमतीचे १,३०,६८,९६६ सक्तीने कन्वर्टिबल प्रेफरन्स शेअर (**"प्रेफरन्स शेअर्स"**), प्रत्येक प्रेफरन्स शेअर कोणतेही कर वगळता प्रति वर्ष १०% (इश्यूच्या किंमतीवर गणना केलेला) डिविडंड (or लाभांश) मिळवेल आणि जारी केल्याच्या तारखेपासून १८ महिन्यांमध्ये १ इक्विटी शेअरमध्ये परिवर्तित होईल;

(ख) टेंडर ऑफरच्या अनुसार कंपनीच्या सार्वजनिक भागधारकांकडून अॅक्वायरर द्वारा कंपनीच्या ३,७१,९५,४११ इक्विटी शेअर्सचे संपादन, आणि

(ग) ICM कडून (एका किंवा दोन ट्रॅंचेसमध्ये) ह्यांची खरेदी: (१) ICM द्वारा धारण केलेले ५०,००,००० इक्विटी शेअर्स; आणि (२) ICM द्वारा धारण केलेले असे अतिरिक्त इक्विटी शेअर्स (कमाल ३०,००,००० इक्विटी शेअर्सपर्यंत) जे, वरील (क) (ख) आणि ग (१) अंतर्गत दि अॅक्वायरर द्वारा संपादन केलेल्या सिक्युरिटीजसह, पूर्णपणे सौम्यीकृत धर्तीवर कंपनीच्या भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या ४०% (चाळीस टक्के) भरतील;

(एकत्रित हे **"प्रस्तावित व्यवहाराच्या"** [or **"प्रस्तावित ट्रॅंजॅक्शनच्या"**] संदर्भात आहे).

प्रस्तावित व्यवहाराच्या [or प्रस्तावित ट्रॅंजॅक्शनच्या] समाप्तीनंतर, दि अॅक्वायरर, कंपनीच्या नियंत्रणाचे संपादन करतील आणि लागू कायद्याच्या अनुसार त्यांचे कंपनीचे 'प्रवर्तक' म्हणूनही वर्गीकरण केले जाईल. दि सेलरचे नियंत्रण सुरू राहील आणि कंपनीचे प्रवर्तक म्हणून त्याचे वर्गीकरण केले जाईल.

प्रस्तावित व्यवहारामुळे [or प्रस्तावित ट्रॅंजॅक्शनमुळे] कंपनीला बाह्य फायनान्स उभारणे, परिचालनामध्ये सुधारणा घडवणे आणि व्यवसायाची व्याप्ती वाढवणे सुरू ठेवणे शक्य होण्यासाठी जागतिक पातळीवरच्या फायनान्शियल सर्विसेसच्या कामातील दि अॅक्वायररच्या नैपुण्याचा लाभ घेता येईल. प्रस्तावित व्यवहारामुळे [or प्रस्तावित ट्रॅंजॅक्शनमुळे] कंपनीच्या रीटेल बिझनेसच्या सुरू असलेल्या वाढीला आणखी पाठबळ मिळेल आणि अॅक्वायररची मालकी कॉर्पोरेट प्रशासनाच्या बाबतीत जागतिक नावलौकिक आणि जागतिक पातळीवरच्या सर्वोत्तम पद्धतीदेखील सोबत आणेल.

आरबीआय अनुमती

कंपनीने प्रस्तावित व्यवहाराच्या [or प्रस्तावित ट्रॅंजॅक्शनच्या] संदर्भात, आरबीआयकडून आरबीआय डायरेक्शन्सच्या परिच्छेद ६६ अंतर्गत, ह्यासाठी अनुमती मिळवली आहे (१) दि अॅक्वायरर द्वारा कंपनीच्या नियंत्रणाचे प्रस्तावित संपादन; (२) वर उल्लेख केल्याप्रमाणे, दि अॅक्वायररद्वारा कंपनीच्या भरणा केलेल्या भाग भांडवलाचे, सक्तीच्या ओपन ऑफरमधील प्रत्यक्ष टेंडरिंगच्या सापेक्ष, पूर्णपणे सौम्यीकृत धर्तीवर ४०% (चाळीस टक्के) प्रस्तावित संपादन; आणि (३) कंपनीच्या संचालक मंडळावर दि अॅक्वायररने नावे सुचवलेल्या दोन संचालकांच्या नियुक्तीच्या मार्गाद्वारे होणाऱ्या बदलांसह कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये होणारे आनुषंगिक बदल. आरबीआय डायरेक्शन्सच्या परिच्छेद ६९ च्या अनुसार वैधानिक व नियामक अनुमतींसह (आरबीआयकडून मिळणाऱ्या अनुमतीसह) विविध शर्तींची पूर्तता केल्यानंतर आणि ह्या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ३० (तीस) दिवस पूर्ण झाल्यानंतर हा प्रस्तावित व्यवहार [or प्रस्तावित ट्रॅंजॅक्शन] कार्यान्वित होईल.

आरबीआयने, २१ एप्रिल २०२० च्या ई-मेल द्वारे, आरबीआयची अनुमती मिळण्याच्या आधी, ही सूचना जारी (or प्रसृत) करण्याला परवानगी दिली आहे. ही सूचना वरील बाबतीत आरबीआयची अनुमती मिळणे बाकी असताना जारी (or प्रसृत) करण्यात आली आहे आणि तिचे उद्दिष्ट जनतेला कंपनीच्या नियंत्रणातील प्रस्तावित बदल, तिच्या भागधारणेमध्ये होणारा बदल आणि प्रस्तावित व्यवहाराची [or प्रस्तावित ट्रॅंजॅक्शनची] फलश्रुती म्हणून व्यवस्थापनामध्ये होणारा आनुषंगिक बदल ह्यासंबंधी सूचना देणे हे आहे.

ह्यासंबंधात कोणताही खुलासा आणि/ किंवा आक्षेप असतील तर ते कंपनीला ह्या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत कंपनीच्या कार्यालयाच्या नोंदणीकृत पत्त्यावर श्री. जितेंद्र भाटी, एसव्हीपी - अनुपालन आणि सचिवात्मक, ह्यांच्या नावे पाठवावेत किंवा येथे ईमेल करावेत : icf.legal@indostarcapital.com

ह्या सूचनेची एक प्रत कंपनीच्या वेबसाइटवर www.indostarcapital.com **येथे देखील उपलब्ध आहे.**

सही/-
इंडोस्टार कॅपिटल फायनान्स लिमिटेड
सही/-
बीसीपी V मल्टिपल होल्डिंग्ज पीटीई लिमिटेड
सही/-
इंडोस्टार कॅपिटल

स्थळ : मुंबई
तारीख : २२ एप्रिल २०२०

IDFC
IDFC MUTUAL FUND

NOTICE

Declaration of Dividend:

Notice is hereby given that the Board of Directors of IDFC AMC Trustee Company Limited (Trustee to IDFC Mutual Fund) has approved the declaration of dividend under the Dividend Option(s) of the following Scheme(s)/ Plan(s), subject to availability of *distributable surplus, with the Record Date as #Tuesday, April 28, 2020.

Scheme(s) Name	Plan(s)	Option(s)	Quantum of Dividend* (Rs. per Unit)	NAV (in Rs.) Per Unit as on April 21, 2020
IDFC Arbitrage Fund	Regular	Monthly Dividend	0.0318	12.7515
IDFC Arbitrage Fund	Direct	Monthly Dividend	0.0331	13.2639
IDFC Equity Savings Fund	Regular	Monthly Dividend	0.0300	11.52
IDFC Equity Savings Fund	Direct	Monthly Dividend	0.0300	12.13

Face Value per unit is Rs. 10/-.

* TDS and other statutory levies (if any) shall be levied on the amount received by the investor. Considering the volatile nature of markets, Trustee reserves the right to restrict the quantum of dividend upto the per unit distributable surplus available on the Record Date in case of fall in market.

\# If in any case the Record Date falls on a non-business day, the immediately following business day shall be deemed to be the Record Date.

All investors whose names appear in the register of unit holders of the Scheme(s)/Plan(s)/Option(s) as on the close of the record date will be eligible to receive the dividend.

Pursuant to the payment of dividend, NAV of the Scheme(s)/Plan(s)/Option(s) will fall to the extent of payout and statutory levy (if any).

Date: April 22, 2020

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

The *spirit of* Mumbai *is now* 92 years old!

FREE PRESS JOURNAL
NATION | WORLD | POLITICS | SPORTS | EDUCATION | BUSINESS | ENTERTAINMENT
The Family Newspaper
www.freepressjournal.in

MUTUAL FUNDS Sahi Hai

Indiabulls MUTUAL FUND

Investment Manager : Indiabulls Asset Management Co. Ltd. (AMC)
Registered Office: M - 62 & 63, 1st Floor, Connaught Place, New Delhi - 110 001.
Tel.: (011) - 30252900, Fax: (011) - 30252901, Website: www.indiabullsamc.com
CIN: U65991DL2008PLC176627

Notice cum Addendum No. 04/2020

Notice for declaration of dividend in the Scheme(s) of Indiabulls Mutual Fund (IBMF):

NOTICE is hereby given that Indiabulls Trustee Co. Ltd., Trustee to Indiabulls Mutual Fund (IBMF), has approved the declaration of dividend in the Dividend Option offered under the Plan(s) of Indiabulls Arbitrage Fund (An open ended scheme investing in arbitrage opportunities) of IBMF:

Name of the Scheme/ Plan/ Option	# Amount of Dividend (₹ per Unit)	Record Date	Face Value (₹ per Unit)	NAV as on 20.04.2020 (₹ per Unit)
Indiabulls Arbitrage Fund - Direct - Monthly Dividend Option (Payout and Reinvestment)	0.055	28.04.2020	10	10.6427
Indiabulls Arbitrage Fund - Regular - Monthly Dividend Option (Payout and Reinvestment)	0.055		10	10.5222

Dividend will be subject to the availability of distributable surplus and may be lower, depending on the distributable surplus available on the Record Date.

Pursuant to payment of dividend, the NAV of the Dividend Option(s) of the above Scheme(s) would fall to the extent of payout and statutory levy, if any.

Income distribution/ Dividend will be paid to those Unit holders/ Beneficial Owners whose names appear in the Register of Unit holders maintained by the Mutual Fund/ Statement of Beneficial Ownership maintained by the Depositories, as applicable, under the Dividend Option(s) of aforesaid Scheme(s) on the Record Date.

With regard to Unit holders of the aforesaid Scheme(s) who have opted for Reinvestment facility under the Dividend Option(s), the dividend due will be reinvested by allotting Units for the Income distribution/ Dividend amount at the prevailing ex-dividend NAV per Unit on the Record Date.

Intimation of any change of address/ bank details should be immediately forwarded to the Investor Service Centers of IBMF (for units held in non-demat form)/ Depository Participant (for units held in demat form).

The Trustee reserves the right to declare dividend under the dividend option(s) of the Scheme(s) depending on the availability of distributable surplus.

As per the Go Green Initiative, investors are encouraged to register/update their email id and mobile number with us to support paper less communications.

For Indiabulls Asset Management Co. Ltd.
(Investment Manager to Indiabulls Mutual Fund)
Sd/-
Uday Diwale
Compliance Officer

Place : Mumbai
Date : April 22, 2020

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

YES BANK

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय:
येस बँक लिमिटेड (''बँक'')
येस बँक टॉवर, IFC 2, 15वा मजला, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन (प.), मुंबई - 400 013, भारत.
फोन.: +91(22) 3366 9000 **फॅक्स:** +91(22) 2421 4500 **वेबसाइट:** www.yesbank.in,
ईमेल: shareholders@yesbank.in **CIN:** L65190MH2003PLC143249

सदस्यांकरिता टपाली मतपेटी/ई-मतदानाची सूचना

ह्याद्वारे सदस्यांना सूचना दिली जात आहे, बदल केल्यानुसार, कंपनी कायदा 2013 (**''कायदा''**) चे कलम 110 हे कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) कायदा, 2014 च्या नियम 22 सोबत वाचले असता त्यानुसार, येस बँक लिमिटेड (**''बँक''**) आपल्या सदस्यांकडून 21 एप्रिल 2020 (**''सूचना''**) तारखेच्या टपाली मतपेटी सूचनेत नेमलेला ठराव, टपाली मतपेटीमधून आणि इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मतदान करून, मान्य करण्यासाठी मंजुरी मागवत आहे.

कायद्याचे कलम 110 हे कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) कायदा, 2014 च्या नियम 22 सोबत वाचले असता आणि कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रायलाने जारी केलेल्या 13 एप्रिल 2020 तारखेच्या ('परिपत्रक') सामान्य परिपत्रक क्रमांक 17/2020 नुसार, ही टपाली मतपेटीची सूचना बुधवार, 22 एप्रिल 2020 रोजी, फक्त ज्या सदस्यांनी बँकेकडे (*भौतिक स्वरूपात धारण केलेल्या समभागांसंदर्भात*) किंवा डिपॉझिटरी सहभागींकडे (*अभौतिक स्वरूपात धारण केलेल्या समभागांसंदर्भात*) ई-मेल पत्ता नोंदवला आहे आणि संबंधित डिपॉझिटरीने बँकेला उपलब्ध करून दिला आहे, त्यांनाच ई-मेलद्वारे पाठवली आहे. सदस्यांच्या मंजुरी किंवा नामंजुरीचा संपर्क फक्त दुरस्थ ई-मतदान पध्दतीनेच होईल.

ज्यांना भौतिक टपाली मतपेटी पाठवता आली नाही त्यांनी समभागधारकांच्या ई-मतदान प्रक्रियेत सहभागी होण्य